# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

## // गोषवारा //

दि. 24/08/2023

**प्रकरण क्र.** 42 :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या Intelligent Transport System (ITS) अद्यावत करण्यासाठी सहाय्यक अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी Detailed Project Report (DPR) भारत सरकार, रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीस पाठविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

भारत सरकार रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडील दि.23/06/2022 रोजीच्या पत्रानुसार परिवहन सेवेमधील Intelligent Transport System (ITS) मजबुत करण्यासाठी सहाय्यक अनुदान योजना जाहीर केलेली आहे. त्यानुसार एकूण प्रकल्प किमतीच्या 70% अनुदान केंद्र शासनाकडून व 30% गुंतवणुक संबंधीत परिवहन उपक्रमास करावी लागणार आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Intelligent Transport System (ITS) अद्यावत करणेकरीता परिवहन उपक्रमात कार्यरत Intelligent Transport System (ITS) यंत्रणेचा अभ्यास करून Intelligent Transport System (ITS) अद्यावत करण्यासाठी Detailed Project Report (DPR) तयार करून केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

त्याकरीता Detailed Project Report (DPR) तयार करणेसाठी निश्चित केल्याल्या (Scope Of Work) प्रमाणे कामाचे स्वरूप निश्चित करून महाराष्ट्र शासनाने empanelled केलेल्या संस्थेपैकी M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. या संस्थेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची 'ड' मधील प्रकरण 5(2) (2) अन्वये 02 महिने कालावधीकरीता प्रशासकीय ठराव क्र.231 दि.06/02/2023 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. यांना दि.08/03/2023 रोजी Detailed Project Report (DPR) तयार करणेकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. सल्लागार यांनी Draft Detailed Project Report (DPR) तयार करून दि.29/03/2023 रोजी दिला असून मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त व परिवहन विभागाशी विचार विनिमय करून Final Detailed Project Report (DPR) दि.18/04/2023 रोजी सादर केला आहे. तरी, सदरचा Detailed Project Report (DPR) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीकरीता पाठविणे आवश्यक आहे.

ITS अद्यावत करणेसाठी Detailed Project Report (DPR) नुसार एकूण प्रकल्प किंमतीच्या 70% अनुदान केंद्र शासनाकडून व 30% गुंतवणुक मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास करावी लागणार आहे. सदर एकूण प्रकल्प रक्कम रू.11,29,24,598/- इतकी असून सदरचा Detailed Project Report (DPR) मंजुर झाल्यानंतर केंद्र शासन रस्ते व वाहतूक व महामार्ग यांचेकडून 70% सहाय्यक अनुदान रक्कम रु.7,90,47,219/- इतके प्राप्त होऊ शकेल व उर्वरीत 30% रक्कम

रू.3,38,77,379/- मिरा भाईंदर महानगरपालिका फंडातून खर्च करावी लागेल. सदरकामी सन 2023-24 चे अर्थसंकल्पात "ब भांडवली खर्च 9. केंद्र व राज्य शासन अनुदान खर्च (2.) ITS अद्यावतीकरण खर्च (केंद्र शासन व मनपा हिस्सा)" या लेखाशिर्षकामध्ये रक्कम रू.11.00 कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

तरी, सदरचा Detailed Project Report (DPR) अंतिम करून केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीस पाठविणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

25/04/23

(अनिकेत मानोरकर)

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २६/४/२०२३ वेळ: स.१०:३०वा.
मा. स्थायी समिती / प्रशासकीय गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ......४२..... वर्ष :- २०२३-२४

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\२०२३-२४\ITS\Goshwara -.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
## प्रशासकीय ठराव दि.२१/०४/२०२३

**प्रकरण क्र.४२**:- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या Intelligent Transport System (ITS) अद्यावत करण्यासाठी सहाय्यक अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी Detailed Project Report (DPR) भारत सरकार, रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीस पाठविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव ४२ :-**

भारत सरकार रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडील दि.23/06/2022 रोजीच्या पत्रानुसार परिवहन सेवेमधील Intelligent Transport System (ITS) मजबुत करण्यासाठी सहाय्यक अनुदान योजना जाहीर केलेली आहे. त्यानुसार एकूण प्रकल्प किमतीच्या 70% अनुदान केंद्र शासनाकडून व 30% गुंतवणुक संबंधीत परिवहन उपक्रमास करावी लागणार आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Intelligent Transport System (ITS) अद्यावत करणेकरीता परिवहन उपक्रमात कार्यरत Intelligent Transport System (ITS) यंत्रणेचा अभ्यास करून Intelligent Transport System (ITS) अद्यावत करण्यासाठी Detailed Project Report (DPR) तयार करून केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

त्याकरीता Detailed Project Report (DPR) तयार करणेसाठी निश्चित केल्याल्या (Scope Of Work) प्रमाणे कामाचे स्वरूप निश्चित करून महाराष्ट्र शासनाने empanelled केलेल्या संस्थेपैकी M/s PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. या संस्थेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची 'ड' मधील प्रकरण 5(2) (2) अन्वये 02 महिने कालावधीकरीता प्रशासकीय ठराव क्र.231 दि.06/02/2023 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. यांना दि.08/03/2023 रोजी Detailed Project Report (DPR) तयार करणेकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

M/s. PricewaterhouseCoopers Pvt. Ltd. सल्लागार यांनी Draft Detailed Project Report (DPR) तयार करून दि.29/03/2023 रोजी दिला असून मा.आयुक्त, मा.अति.आयुक्त व परिवहन विभागाशी विचार विनिमय करून Final Detailed Project Report (DPR) दि.18/04/2023 रोजी सादर केला आहे. तरी, सदरचा Detailed Project Report (DPR) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीकरीता पाठविणे आवश्यक आहे.

ITS अद्यावत करणेसाठी Detailed Project Report (DPR) नुसार एकूण प्रकल्प किंमतीच्या 70% अनुदान केंद्र शासनाकडून व 30% गुंतवणुक मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास करावी लागणार आहे. सदर एकूण प्रकल्प रक्कम रू.11,29,24,598/- इतकी असून सदरचा Detailed Project Report (DPR) मंजुर झाल्यानंतर केंद्र शासन रस्ते व वाहतूक व महामार्ग यांचेकडून

70% सहाय्यक अनुदान रक्कम रु.7,90,47,219/- इतके प्राप्त होऊ शकेल व उर्वरीत 30% रक्कम रू.3,38,77,379/- मिरा भाईंदर महानगरपालिका फंडातून खर्च करावी लागेल. सदरकामी सन 2023-24 चे अर्थसंकल्पास "ब भांडवली खर्च 9. केंद्र व राज्य शासन अनुदान खर्च (2.) ITS अद्यावतीकरण खर्च (केंद्र शासन व मनपा हिस्सा)" या लेखाशिर्षकामध्ये रक्कम रू. 11.00 कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

तरी, सदरचा Detailed Project Report (DPR) अंतिम करून केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे मंजुरीस पाठविणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\२०२३-२४\ITS\Tharav -.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // गोषवारा //

दि.२६/०४/२०२३

प्रकरण क्र. (४३) :- शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी पर्यंतची मिरा भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंथरलेल्या मुख्य वितरण जलवाहिनीस रंगकाम करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन अतिरिक्त 75 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर करण्यात आलेला होता. सदर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी पर्यंत 1800 मि.मी. व 1590 मि.मी. व्यासाची मुख्य वितरण जलवाहिनी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत अंथरण्यात आलेली आहे. सदर जलवाहिनीची मालकी मिरा भाईंदर महानगरपालिकेचीच असून शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी या दरम्यानची जलवाहिनी दररोजच्या देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत केली जाते. परंतु सदर जलवाहिनी गंजुन खराब होऊ नये ही जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे. सदर जलवाहिनी गंजल्यामुळे रंगकाम करणेचे अंदाजपत्रक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तयार करुन सदर रक्कम अदा करणेबाबत कळविलेले आहे. सदर मुख्य वितरण जलवाहिनीची देखभाल, दुरुस्ती व परिचलन काम करणेकरीता विषयांकीत काम करणे गरजेचे आहे. अन्यथा जलवाहिनी नादुरुस्त झाल्यास त्याचा परीणाम मिरा भाईंदर शहरातील पाणी पुरवठयावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदरचे काम करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंथरलेल्या मुख्य वितरण जलवाहिनीस रंगकाम करणेकरणेच्या कामास रक्कम रु.3,45,62,300/- इतका खर्च अपेक्षित असल्याबाबत कळविलेले आहे. तरी सदर रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अदा करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

**प्रशासकिय ठराव दिनांक २६/ ४ /2023 रोजी सायं ५.३० वाजता**

**विषय क्रमांक - (४३)** शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी पर्यंतची मिरा भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंथरलेल्या मुख्य वितरण जलवाहिनीस रंगकाम करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन अतिरिक्त 75 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर करण्यात आलेला होता. सदर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी पर्यंत 1800 मि.मी. व 1590 मि.मी. व्यासाची मुख्य वितरण जलवाहिनी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत अंथरण्यात आलेली आहे. सदर जलवाहिनीची मालकी मिरा भाईंदर महानगरपालिकेचीच असून शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी या दरम्यानची जलवाहिनी दररोजच्या देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत केली जाते. परंतु सदर जलवाहिनी गंजुन खराब होऊ नये ही जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे. सदर जलवाहिनी गंजल्यामुळे रंगकाम करणेचे अंदाजपत्रक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तयार करुन सदर रक्कम अदा करणेबाबत कळविलेले आहे. सदर मुख्य वितरण जलवाहिनीची देखभाल, दुरुस्ती व परिचलन काम करणेकरीता विषयांकीत काम करणे गरजेचे आहे. अन्यथा जलवाहिनी नादुरुस्त झाल्यास त्याचा परीणाम मिरा भाईंदर शहरातील पाणी पुरवठ्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे काम करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंथरलेल्या मुख्य वितरण जलवाहिनीस रंगकाम करणेकरणेच्या कामास रक्कम रु.3,45,62,300/- इतका खर्च अपेक्षित असल्याबाबत कळविलेले आहे.

सदर सदर रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अदा करणेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरीस प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र. ४३ दिनांक</u> २६/४/२०२३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन शिळ संतुलन टाकी ते मुकुंद कंपनी पर्यंतची मिरा भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेने अंथरलेल्या मुख्य वितरण जलवाहिनीस रंगकाम करणे

आवश्यक आहे. सदर कामास रक्कम रु.3,45,62,300/- इतका खर्च अपेक्षित असून सदर रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अदा करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. परि... ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग.